FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154155

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station खेरवाडी, पहिली खबर क्र. FIR No. २८, वर्ष Year २०२०, दिनांक Date २४/१२/२०२०

2. (i) अधिनियम Act म. पो. अधिनियम १९५१, कलमे Sections ६८

(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from १७/१२/२० वेळ Time १५:०० वा., तारीख पर्यंत Date to २४/१२/२० वेळ Time १६:५१ वा.

येळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २४/१२/२० वेळ Time १६:४५ वा.

(c) गुन्हा दाखल झालेचे सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२० तारीख Date २४/१२/२० वेळ Time ५:४५

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा अंदाजे ०८ कि. मि., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........

Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मतदार नोंदणी अधिकारी, १७६, वांद्रे पूर्व विधानसभा मतदार संघ यांचे मध्यवर्ती निवडणूक कार्यालय, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर) शासकीय वसाहत वांद्रे-पूर्व-मुं.५१, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place नजीक आयकर व पारिसिमा ऑफ. वांद्रे पूर्व, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka मुं-५१, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........

In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name शिरीष शांताराम ओझा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name शांताराम ओझा

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८४२४०३०९६३

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ब्राह्मण, जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address : संत तुकाराम गृहनिर्माण संस्था - २, बी - २०१, रूम - २, महाराणा नगर, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., मोटर्स नं. Card No.

रस्त्याचे नाव Road आर.के.मार्ग, वांद्रे-पूर्व, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka वांद्रे-पूर्व, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

आरोपी ललित भास्कराव मुरकुटे, वय - ३१ वर्षे, नोकरी - लिपीक - टंकलेखक, तहसिलदार कार्यालय अंधेरी (प), मुंबई, सध्याची नेमणूक - पुरवठा, मतदार नोंदणी अधिकारी, १७६ वांद्रे-पूर्व विधानसभा मतदार संघ यांचे मध्यवर्ती निवडणूक कार्यालय, वांद्रे-पूर्व, मुंबई-५१. रा. ठी. कुणाल दर्शन बिल्डींग नं. २, रू.नं. १०२, देसले पाडा, डोंबिवली (प), ठाणे.



Scanned with CamScanner

फिर्यादी चा जबाब

---

यातील फिर्यादी श्री. शिरीष शांताराम गांधी, रा. ठी. संत तुकाराम गृहनिर्माण संस्था-२, बी-२०१, विंग-२, साईबाबा नगर, वांद्रे-पुर्व, मुंबई-५१, यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(राहुल धुमाळ)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

एस एस गांधी
(श्री. शिरीष शांताराम गांधी)

Scanned with CamScanner

जबाब दि.२५/१२/२०२०

श्री.शिरीष शांताराम गांधी, हि.५८ वर्षे, धंदा–व्यवसाय, पत्ता:–साईबाबा नगर, संत तुकाराम गृहनिर्माण संस्था–२, बी २०१, विंग २ अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१ मोबाईल क्र. ८४२५०३०१७३

---

मी वरीलप्रमाणे असून सन १९९० पासुन जी–१९, तुकाराम चाळ नं.२६, साईबाबा नगर, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१ या पत्यावर २००९पर्यत रहात होतो. मी नेशनल कॉलेजच्या समोर फुटपाथवर कपडे विकून माझा उदरनिर्वाह करीत आहे.

सन २००९ साली झोपडपट्टी पुर्नवसन प्राधीकरणाच्या माध्यमातुन सदर ठिकाणी झोपडया तोडून दोन इमारती बांधण्यात आल्या. सदरचा प्रकल्प हा श्री. के मनियार बिल्डर आणि डेव्हलपर्स यांनी उभा केला. नमुद ठिकाणी माझ्या झोपडयाच्या बदल्यात मला एसआरए यांनी अद्याप पर्यत फ्लॅट दिलेला नाही. तसेच एनएक्स–२ यादीमध्ये एसआरए यांनी माझे सोबत श्री.रामचंद्र मुसळीराम गुप्ता यांचे नांव दाखल केले असल्याने माझा एसआरए सोबत माझ्या खोलीच्या संदर्भात वाद चालू आहे.

माझे नांव मतदार यांदी मध्ये आहेकिंवा कस? याबाबत कागदोपत्री पुरावाआपल्याकडे असावा म्हणूनमतदान यांदीचा उतारा मिळण्याकरीता मी दिनांक ११/१२/२०१९ रोजी मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), विधानसभा मतदार संघ, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर), शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१ येथे अर्ज सादर केलेला होता.

उपरोक्त कामासंदर्भात मी यापूर्वी नमुद कार्यालयात जावून वेळोवेळी भेट दिली परंतु लॉकडाऊन असल्यामुळे माझे काम झालेले नाही. तसेच मला अद्याप पर्यत मी दिनांक११/१२/२०१९ रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नव्हती. दिनांक १७/१२/२०२० रोजी मी सकाळी ११.०० वाजता नमुद कार्यालयात जावून मी केलेल्या अर्जाची चौकशी करण्याकरीता मतदान नोंदणी अधिकारी यांची भेट घेतली व मी दिलेल्या अर्जा संदर्भात विचारणा केली असता सदर कार्यालयातील मतदान नोंदणी अधिकारी यांनी माझ्याकडे रु.५०००/– रूपयांची लाचेची मागणी केली.व तेथील शिपाई यांनी देखील आमचे काही वेगळे रुपये घेवून ये असे सांगितले. त्यानंतर मतदार यादीचा उतारा दिला जाईल असे त्यानी मला सागितले.

मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), विधानसभा मतदार संघ, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर), शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१येथील मतदान नोंदणी अधिकारी व शिपाई यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १७/१२/२०२० रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. धुमाळ यांनी मतदान नोंदणी अधिकारी वशिपाईहे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मला मराठी वाचता येते परंतु लिहिता येत नसल्याने पो.नि. धुमाळ यांनी मी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे मराठी भाषेमध्ये अर्ज स्वत: कॉम्पुटरवर टंकलिखित करून त्याची प्रिंट काढून मला दाखविली. व सदर अर्ज वाचून झाल्यावर तो बरोबर असल्याची खात्री झाल्याने त्यावर मी सही केली. त्या दिवशी मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व),यांच्या कार्यालयाची वेळ संपत आल्याने पो.नि.धुमाळ यांनी माझे अर्जावर

समक्ष Dhumal. पुस पुस. गांधी

Scanned with CamScanner

दिनांक १८/१२/२०२० रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक १८/१२/२०२० रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता येण्यास सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १८/१२/२०२० रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदरवेळी स.पो.आ कालेकर व दोन पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोनि धुमाळ यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ कालेकर यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक १७/१२/२०२० रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.धुमाळ यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन ासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि.धुमाळ यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि धुमाळ यांनी दिनांक १८/१२/२०२० रोजी पंचांसमक्ष मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), विधानसभा मतदार संघ, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर), शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१येथील मतदान नोंदणी अधिकारी व शिपाई यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून एल.एस.रहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा पुर्व, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला पो.नि.धुमाळ यांनी मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व),यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. काकडे यांचे सह पाठविले असता मतदान नोंदणी अधिकारीयांची भेट झाली. त्यावेळी मतदान नोंदणी अधिकारीयांचेशीकामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक मतदान नोंदणी अधिकारीयांनी माझेकडे रू. ५,०००/—व पेनाच्या बॉक्सची लाचेची मागणी केली असता मी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था करण्याकरीता काही दिवसांची मुदत मागितली असता त्यांनी मला बुधवारी येण्यास सांगितले. त्यावेळी माझेसाबत असलेले पंच श्री. काकडे यांनी मतदान नोंदणी अधिकारी यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव ललित घोरपडे असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी पुन्हा एल.एस.रहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा पुर्व, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो.पो.नि. धुमाळ यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक घोरपडे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांना लाचेची रक्कम घेवुन बुधवारी येण्यास सांगितल्याने तसेच अन्य लोकसेवक शिपाई शिंदे यांची सुध्दा पडताळणी करावयाची बाकी असल्याने पुढीलकारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पो.नि.धुमाळ यांनी मला घरी जाण्यास सांगितले व लाचेच्या मागणीप्रमाणे मला रू. ५,०००/— ची व्यवस्था करून बुधवारी लाप्रवि कार्यालयास येण्यास सांगितले. दि. २३/१२/२०२० रोजी बुधवारी मी पो.नि. धुमाळ यांचेशी प्रत्यक्ष भेट घेवुन पैशाची व्यवस्था न झाल्याने व मला कार्यालयात येण्यास उशिर झाल्याने मी दि. २४/१२/२०२० रोजी लाचेची रक्कम घेवुन येतो असे सांगितले.

समक्ष
Plmmaul.

एस एस गांधी

Scanned with CamScanner

मी दिनांक २४/१२/२०२०लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात सकाळी १०:०० वाजता हजर झालो. मी पो.नि.धुमाळ यांना रू. १,०००/— लाचेची रक्कम माझेकडे असल्याचे सांगितले. पो.नि. धुमाळ यांनी माझेकडे १,०००/— रूपये असल्याने उर्वरीत ४,०००/— रूपये हे खेळण्यातील नोटा लाचेच्या रक्कमेकरीता वापरत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी आज रोजी पुन्हा पडताळणी व सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले.

पो.नि. धुमाळ यांनी माझी पुन्हा पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून एल.एस.रहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा पुर्व, मुंबई येथे थांबलो.त्यानंतर पो.नि. धुमाळ यांनी मला पुन्हा पडताळणीच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या व पंच काकडे यांच्यासोबत जावून लोकसेवक यांची मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे भेट घेण्यास सांगितले. पो.नि.धुमाळ यांनी लोकसेवक घोरपडे यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. काकडे यांचे सह ऑटोरिक्षाने पाठविले. माझी व लोकसेवक घोरपडे यांची भेट झाली व आमच्या दोघांमध्ये कामासंदर्भात व पैशाबाबत चर्चा झाली व तडजोडीअंती रू. ४,५००/— लाचेची रक्कम देण्याचे ठरले.

त्यानंतर मी पुन्हा एल.एस.रहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा पुर्व, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. धुमाळ यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक ललित घोरपडे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानेव लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे मला पो.नि. धुमाळ यांनी सांगितले.त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.त्यानंतर लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ४,५००/— (रू. १००/— दराच्या १० भारतीय चलनी नोटा व १०० दराच्या ३५ खेळण्यातील नोटा ) स्वत:चे ताब्यात घेतल्या व एका खाकी रंगाच्या पाकिटात भरून ठेवल्या. सदर नोटांना व खाकी रंगाच्या पाकीटास ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन ॲंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले.पो.नि.धुमाळ यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोक्यावरून डावा हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर एल.एस.रहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा पुर्व, मुंबईयेथे पोलीस वाहनात पंचासमक्ष पेनाच्या बॉक्सला व लाचेच्या रक्कमेस ॲंथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटात ठेवून पाकीटास वरून ॲंथ्रासीन पावडर लावली मी सदरचे पाकीट माझे पॅंटीच्या उजव्या खिशातव पेनाचा बॉक्स ार्टाच्या वरील खिशात ठेवले. त्यानंतर तेथून आम्ही शासकीय वसाहत इमारत क्र.ब/५७ येथे दोन्ही शासकीय वाहनासह आल्यानंतर पो.नि.धुमाळ यांनीमाझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. काकडे यांचेसहसापळा कारवाईकरीता लोकसेवक ललित घोरपडे यांचे मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व),येथील कार्यालयात पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवक ललित घोरपडे यांच्या कार्यालयात गेलो

समक्ष
[signature]

एस एस गांधी

Scanned with CamScanner

असता लोकसेवक ललित घोरपडे हे कार्यालयात हजर होते. लोकसेवक ललित घोरपडे यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करीत असतानाच त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी लोकसेवक घोरपडे यांनी मागितल्यानंतर माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ४,५००/– (रू. १००/– दराच्या १० भारतीय चलनी नोटा व १०० दराच्या ३५ खेळण्यातील नोटा ) भरलेले पाकीटव पेनाचा बॉक्सत्यांना दिला असता त्यांनी लाचेची रक्कम स्विकारून त्यांच्या टेबलाच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलीव पेनाचा बॉक्स हा टेबलारवरच ठेवला.लोकसेवक ललित घोरपडे यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मीसापळा पथकास दिसेल अशारीतीनेमाझा डावा हात केसावरून फिरवुन सापळा पथकासपुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक ललित घोरपडे यांस पेनाचा बॉक्स व रक्कम रू. ४,५००/– (रू. १००/– दराच्या १० भारतीय चलनी नोटा व १०० दराच्या ३५ खेळण्यातील नोटा ) लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव ललित भाऊराव गुरपुडे, वय–३१ वर्षे, धंदा–नोकरी, पद लिपीक–टंकलेखक, नेमणुक– तहसिलदार कार्यालय,अंधेरी, डि.एन. रोड, अंधेरी (प.), मुंबई. सध्याची नेमणुक –प्रगणक, मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), विधानसभा मतदार संघ, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर), शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१, रा.ठि.– कृष्णा हायलॅन्ड बिल्डींग नं. २, रूम नं. १०२, देसले पाडा, डोंबिवली (प), जिल्हा ठाणे. मुळ पत्ता– मु. चिखलपसोली, पो. विलम, ता. नागबीड, जि. चंद्रपुर. असे असल्याचे मला,पंचांना व पोलिस पथकास सांगितले.

माझे नांव मतदार यांदी मध्ये आहे किंवा कसे?याबाबत कागदोपत्री पुरावा आपल्याकडे असावा म्हणून मतदान यांदीचा उतारा मिळण्याकरीता मी लेखी अर्जाव्दारे मतदान नोंदणी अधिकारी १७६, वांद्रे (पूर्व), विधानसभा मतदार संघ, कम्युनिटी हॉल (समाज मंदिर), शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१ येथे दिनांक ११/१२/२०१९ रोजी अर्ज केला होता. सदरची माहिती देण्यासाठी या कार्यालयातील लोकसेवक ललित भाऊराव गुरपुडे यांनी माझेकडेदि. १८/१२/२०२० रोजी रू. ५,०००/– लाचेची रक्कम व पेनाचा बॉक्सची मागणी केली व दि.२४/१२/२०२० रोजी तडजोडीअंती रू.४,५००/– लाचेची रक्कम व पेनाचा बॉक्स स्विकारला म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक ललित भाऊराव गुरपुडे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुनवाचून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,
Rhmmal

( राहूल धुमाळ ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

पुरु पुरु गांधी

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी मतदार नोंदणी अधिकारी १७४ वांद्रे-पूर्व विधानसभा मतदार संघ, निवडणूक कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे मतदार यादीचा उतारा मिळविण्याकरिता दि. ०१/१२/२०१८ रोजी अर्ज केला होता, सदर मतदार यादीचा उतारा देण्याकरिता लोकसेवक श्री. [illegible] यांनी फिर्यादी यांचेकडे रु. ५,०००/- लाचेच्या [illegible] मागणी करून तडजोडीअंती रु. ४,५००/- (रु. १००/- दराच्या भारतीय चलनी नोटा व ३५ [illegible] नोटा) [illegible] कोणत्याही कायदेशिर पारिश्रमिका व्यतिरिक्त स्वतःच्या फायद्याकरिता स्विकारली म्हणून कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. राहुल धुमाळ, ला. प्र. वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

एस एस गांधी

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ राहुल धुमाळ

पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ........ ला. प्र. वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 24/12/2020

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner